## - अयोध्या मनुनिर्मित नगरी -

शरयू नदीच्या तीरावर कोशल नावाचा धनधान्याने संपन्न, समृद्ध असा देश होता. या देशातील ही प्रसिद्ध अशी अयोध्यानगरी स्वतः मनुने वसवली आहे असे म्हटले जाते. अत्यंत शोभायमान अशी ही विस्तीर्ण नगरी बारा योजने लांब व तीन योजने रुंद अशी होती. स्वर्गात अशी देवेंद्राची अमरावती तशीच पृथ्वीवर अयोध्या समजली जात असे. अशा या अयोध्येच्या चारही बाजूंना खोल खंदक खणलेले होते. त्यात प्रवेश करणे किंवा ते ओलांडणे अतिशय कठीण होते. इतरांसाठी ती नगरी नेहमीच दुर्गम आणि म्हणूनच जिंकण्यास कठीण होती. तिच्यावर पोहोचून कोणालाही युद्ध करणे अशक्य होते. आणि यावरूनच तिचे अयोध्या हे नाम सार्थ ठरते.

या नगरीतील उत्तुंग प्रासाद, प्रशस्त रस्ते, भव्य कमानी, सुंदर शिल्पाकृती यामुळे या नगरीच्या सौंदर्यात भरच पडत असे. अयोध्येतून बाहेर जाणाऱ्या राजमार्गावर दोन्ही बाजूंना फळाफुलांनी युक्त अशा वृक्ष वेली होत्या. त्यावर फुलणाऱ्या विविधरंगी फुलांमुळे व मनमोहक सुगंधामुळे प्रवाशांचा शीण निघून जात असे. या महामार्गावर दररोज पाण्याचा शिडकावा होत असे. हा महामार्ग म्हणजे अयोध्येची शान होता. या मार्गामुळे नगरीला व नगरीमुळे या मार्गाला अधिकच शोभा आली होती. या नगरीच्या विविध दिशांना मोठमोठे दरवाजे व कमानी होत्या. अनेक शिल्पकारांचे वास्तव्य या नगरीत असायचे. आपल्या देखण्या कलाकृतींनी ते नगरीच्या वैभवात नित्य भरच घालत असत.

नुसते बाह्य सौंदर्यच नव्हे तर या नगरीतील धार्मिक प्रजाजन आणि न्यायप्रिय राजा हे याचे वैभव होते. राजा दशरथ धर्माने राज्य करणारा असा प्रजावत्सल राजा होता. या नगरीतील सुंदर व पतिव्रता स्त्रिया आणि गृहस्थ धर्माचे यथायोग्य पालन करणारे सश्रद्ध पुरुष नगरीचे पावित्र्य जपत होते. मनोरंजनासाठी या नगरीत अनेक नाटक मंडळे होती. अनेक स्त्री पुरुष आपल्या नृत्य व अभिनयाचे दर्शन

© www.madhaveraghuveer.com

यातून घडवीत असत. तसेच नित्य अग्निहोत्र करणारे, षड्गुण-संपन्न, वेदशास्त्रसंपन्न असे विद्वान ब्राह्मण म्हणजे या नगरीचे भूषण होते. तसेच स्तुतिपठण करणारे सूत आणि वंशावळ जाणणारे भाटही या नगरीत होते.

या अयोध्यानगरीचे संरक्षण महाराज दशरथांसारख्या पराक्रमी पुरुषाकडून दक्षतेने होत असे. या नगरीत चारही बाजूंना बागा आणि आमराया होत्या. शिवाय सर्व बाजूंना साल वृक्ष होते. तेथील पाणीदेखील इक्षुरसाप्रमाणे स्वादिष्ट होते. पृथ्वीवरील सर्वोत्कृष्ट स्थान, जणू काही स्वर्गच या अर्थाने या नगरीला 'साकेत' अशा नावाने देखील संबोधले जायचे.

या नगरीत अनेक सात मजली प्रासाद होते. घराघरांवर रत्नांची तोरणे माळलेली असायची. दुंदुभी, पणव, नगारे, वीणा अशा वाद्यांच्या मधुर ध्वनीने ही नगरी निनादत असायची. श्रेष्ठ, शूर, पराक्रमी अशा नगरवासी जनांना यामुळे आनंद वाटत असे. येथील सर्वच नगरजन प्रसन्नवृत्तीचे, धर्मात्मा, निर्लोभी बहुश्रुत व सत्यवादी होते. अमोलम वस्तूंचा संग्रह त्यांच्याजवळ असे. उत्तम गोधन, उत्कृष्ट जातीचे घोडे विपुल प्रमाणात होते. सर्वच प्रजाजन धर्ममार्गाने अर्थ व कामाचा आनंद लुटत असत. सुप्रभाती स्नान करून अंगाला चंदनाचा लेप लावण्याची आणि सुमनमाला धारण करण्याची तिथे प्रथा होती. स्त्रीपुरुष हातात बाजूबंद व अलंकार तसेच गळ्यात सुवर्णपदक धारण करत. अनेकांनी अग्निहोत्राचे व्रत आजन्म स्वीकारले होते. व्रतहीन तर कोणीच नसे. राजभक्ती तर प्रत्येकाच्या रक्तातच भिनलेली होती. चारही वर्णांचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहत असत. क्षत्रिय ब्राह्मणांचा मान ठेवत तर वैश्य क्षत्रियांचे आज्ञापालन करत. शूद्र या त्रिवर्गाची सेवा करून आपले कर्तव्यपालन करीत असत. स्वधर्माने वागत असत.

ह्या नगरीचे दरवाजे आणि अर्गळा मजबूत होत्या. अनेक महाल या नगरीत होते. त्यांच्या दरवाजांना सोन्याचे पाणी दिले होते. त्यावर रत्ने जडवली होती. निरनिराळ्या देशांचे व्यापारी या नगरीत येजा करत असत. कर

© www.madhaveeradhuweer.com

देणाऱ्या सामंत पुरुषांच्या समुदयाची इथे सतत वर्दळ असायची. अनेक क्रीडा भवनेही या नगरीत असल्यामुळे व्यायामाबरोबरच मनोरंजनही घडायचे.

ही नगरी द्यूतफलकाच्या आकाराची म्हणजेच चारही बाजूंना राजवीथी (मार्ग) आणि मध्ये मोकळी जागा अशा स्वरूपाची होती. अनेक गगनचुंबी प्रासादांमध्ये अनेक महारथी वास्तव्य करत होते.

यथा राजा तथा प्रजा या न्यायाने धार्मिक, सत्यशील राजाच्या प्रेमळ धाकामुळे प्रजाजनही संयमी, सदाचरणी, धार्मिक होतात. इतकेच नाही तर कधी कधी तर पंचमहाभूते देखील त्याच्यासमोर नतमस्तक होतात. सौम्य स्वरूप धारण करतात. गमतीने असे म्हटले जाते की अयोध्येतील स्त्रिया इतक्या सुंदर, सद्गुणी, सत्‌शील होत्या की त्या रस्त्याने जात असल्या तर वारादेखील अशा संयमाने वहायच्या की अयोध्येतील स्त्रीच्या अंगावरचा पदर देखील फडफडेल. यातील अतिशयोक्तीचा भाग जरी सोडला तरी यावरून आपल्याला निश्चितपणे कल्पना येऊ शकते की अयोध्येतील वातावरण किती नम्र, संयत, धर्मशील होते ते!

अशा या अयोध्यानगरीमध्ये पूर्णावतार अशा श्रीरामचंद्रांचा जन्म झाला. रघुवंशातील पराक्रमी, तेजस्वी पुरुष इथे जन्मले, वावरले, त्यांनी पराक्रम गाजवले. अशा या अयोध्येला सात मोक्षपुरींमध्ये अग्रस्थान मिळाले यात आश्चर्य ते काय! अशी ही अयोध्या मध्यभागी असणाऱ्या पदकाप्रमाणे या रत्नहारात शोभून दिसते.

अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका।
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः॥

x

मोबाइल नं.
9373366611

माधवी रघुवीर जोशी
डी-२६, वुडलँड
गांधी भवन शेजारी
कोथरूड, पुणे
४११०३८

© www.madhaveeraghuveer.com